# आरोग्यावर परिणाम करणारे सामाजिक घटक

**Social Determinants Of Health**

**‘आरोग्यावर परिणाम करणारे सामाजिक घटक’**

**या कोर्ससाठी**

**प्रशिक्षण मार्गदर्शिका क्र. – ४**


**साथी प्रकाशन**

**S**upport for **A**dvocacy & **T**raining to **H**ealth **I**nitiatives

(Action Centre of Anusandhan Trust evolved from CEHAT)

- **संकलन-लेखन**

  सचिन साठे

  तृप्ती मो.मा.

- **मार्गदर्शन**

  डॉ. अभय शुक्ला

  डॉ. नितीन जाधव

**प्रकाशक**

**साथी**

फ्लॅट नं. ३ व ४, अमन (ई) टेरेस, प्लॉट नं. १४०,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११ ०२९
दूरध्वनी क्रमांक - २५४५१४१३, २५४५२३२५
ई-मेल : cehatpun@vsnl.com
वेब साईट : www.sathicehat.org

- **अर्थसहाय्य**

  अलायन्स फॉर हेल्थ पॉलिसी ॲन्ड सिस्टीम रिसर्च, WHO

Alliance for Health Policy and Systems Research

- **तांत्रिक सहाय्य**

  डॉ. भुपिंदर कौर औलख

# या मार्गदर्शिकेविषयी थोडक्यात...

'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन' अंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील आरोग्यविषयक प्रश्न ठळकपणे मांडण्यासाठी तसेच सोडवण्यासाठी आरोग्यसेवांचे नियोजन विकेंद्रित पद्धतीने करण्यास सुरुवात झालेली आहे. परंतु विकेंद्रित नियोजनाची प्रक्रिया आपल्या सर्वांनाच नवीन तसेच थोडी गुंतागुंतीची वाटते. म्हणून या प्रक्रियेला सुलभ व अधिक परिणामकारक बनविण्याचा प्रयत्न या मार्गदर्शिकेद्वारे करण्यात आलेला आहे. आरोग्यसेवांचे नियोजन करण्यापूर्वी आरोग्याची ख-या अर्थाने व्याख्या कशी करावी? आरोग्यावर परिणाम करणारे आधारभूत घटक कोणते? समाजातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती त्यांचा व्यक्तीच्या आरोग्यावर काय दुष्परिणाम होतो व त्यांना कमी तसेच प्रतिबंधित करण्यासाठी काय करणे आवश्यक आहे याबद्दलची माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. ती आपण या मार्गदर्शिकेद्वारे करण्याचा प्रयत्न करणार आहोत. प्रत्येक नागरिकाचे आरोग्य अबाधित राखणे हे शासनाचे कर्तव्य तसेच जबाबदारी असते. शासनाचे नागरिकांच्या आरोग्याप्रती असलेले दायित्व व त्याची पूर्तता करून घेण्यासाठी नागरिकांना हक्काचा वापर कसा करता येईल याचा ऊहापोह या मार्गदर्शिकेत करण्यात आलेला आहे.

आपल्या संविधानाने सर्वांना सन्मानाने जगण्याचा समान हक्क बहाल केलेला आहे. सन्मानपूर्वक आयुष्य जगण्यासाठी निरोगी असणे गरजेचे आहे. आरोग्य हा राज्य शासनाच्या अखत्यारातील मुद्दा असल्याने नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी राज्य शासनावर असते. केवळ पैशाअभावी कोणताही रुग्ण औषधोपचारापासून वंचित राहू नये, याची जबाबदारीही शासनाची असते म्हणूनच आरोग्याला हक्काधारित दृष्टिकोनातून बघण्याची गरज आहे.

प्रत्येक राष्ट्राची प्रगती ही त्या देशातल्या नागरिकांची गुणात्मकता व कृतिशीलता यावर अवलंबून असते. नागरिकांची गुणात्मकता व कृतिशीलता ही त्यांच्या आरोग्यावर अवलंबून असते, तर व्यक्तीचे आरोग्य हे त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच भौगोलिक परिस्थिती आणि पुरवण्यात येणा-या सेवांवर अवलंबून असते.

समाज लोकांच्या समुदायांनी बनतो. त्यात नानाविध प्रकारचे गट आपल्याला दिसून येतात. तसेच आपल्या समाजात कमालीची विषमताही दिसून येते. यात स्त्री, पुरुष, गरीब, श्रीमंत, अनेक धर्मांची, पंथांची लोकं आदिवासी, ग्रामीण, शहरी व दुर्गम भागात राहताना दिसून येतात. समाजात जशी विविधांगी व्यक्ती दिसून येतात तशीच त्यांची विविधांगी जीवनपद्धती देखील असते. प्रत्येकाचे सभोवतालचे वातावरण, त्याची सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक स्थिती, शैक्षणिक पात्रता, जात, धर्म, लिंग, अपंगत्व इत्यादी, व्यक्तीच्या आरोग्यावर सकारात्मक तसेच नकारात्मक परिणाम करीत असतात. अनेक संशोधनावरून असे स्पष्ट होते की, ज्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती चांगली असेल, जे शिक्षित असतील, ज्यांना घरात तसेच समाजात निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते. अशा व्यक्तींना आपले जीवन सुरळीत व निरोगी जगण्याची जास्त संधी मिळते/शक्यता असते. याउलट गरीब, कनिष्ठ जातीतील, अल्पसंख्यांक, अपंग, अशिक्षित, दुर्गम भागात राहणारे व स्थलांतरित व्यक्तींना आरोग्य विषयक समस्या जास्त

प्रमाणात असतात. पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे स्त्रियांची अवस्था तर अधिकच बिकट, घरात तसेच समाजात स्त्रियांना सतत दुय्यम स्थान दिले जाते.

आपल्या 'प्रगत' समाजात कुपोषणाचे प्रमाण वाढतच आहे. कारण समाजात असणारी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती. ज्यांना सोयी सुविधाची गरज आहे त्यांना ते न परवडण्यामुळे रोगांना बळी पडावं लागतं, तर काहींना गरज नसतांनाही प्रचंड सोयी सुविधा केवळ त्यासाठी पैसे मोजण्याची क्षमता असल्यामुळे उपलब्ध होतात. यासाठी ज्यांना जास्त गरज त्यांना जास्त सोयी अशी उपाययोजना असणे गरजेचे आहे व ते कसे करावे याबद्दलची माहिती या मार्गदर्शिकेमध्ये आपण करून घेणार आहोत.

विकेंद्रितरित्या माहितीवर आधारित आरोग्याचे नियोजन करतांना आपापल्या परिसरात आरोग्याची स्थिती कशी आहे हे जाणून घ्यावे लागेल. माहितीवर आधारित विकेंद्रित आरोग्याचे नियोजन करतांना समाजातील सामाजिक, आर्थिक स्थितीचा व्यक्तीच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम कोणते व त्यांना कमी तसेच प्रतिबंधित कसे करावे याबद्दलची माहिती असणे गरजेचे आहे. म्हणूनच या मार्गदर्शिकेमध्ये सुरुवातीला आपण व्यक्तीच्या आरोग्यावर सामाजिक घटकाचा काय दुष्परिणाम होतो याबद्दल चर्चा करणार आहोत. यामध्ये पिण्यासाठी स्वच्छ पाणी, शिक्षण, अन्न सुरक्षा, पोषण, कुपोषण यांचा आरोग्यावर काय परिणाम होतो? त्याचे महत्त्व काय? यासाठी शासन कोणत्या उपाययोजना व त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करत आहे? आरोग्य अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, संस्था-संघटना यांच्या सहकार्याने वरील आरोग्यावर परिणाम करणारे सामाजिक घटकांवर आधारित विकेंद्रित नियोजन महत्त्वाचे आहे आणि यांवरच आधारित या मार्गदर्शिकेमध्ये माहिती करून घेण्याचा प्रयत्न करू या.

❑❑❑

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विषयक स्थानिक गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने आरोग्यसेवांचे नियोजन विकेंद्रित पद्धतीने करण्याची उपाययोजना करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने *'आरोग्यसेवांचे विकेंद्रित नियोजन'* हा प्रशिक्षण कोर्स 'साथी' संस्थेमार्फत सुरू केला आहे. आरोग्य क्षेत्रात काम करणा-या विविध कार्यकर्त्यांची, आरोग्य अधिकारी-कर्मचारी तसेच स्थानिक पंचायत राज लोकप्रतिनिधींची या विषयाबाबतची क्षमता वाढवणे हा या कोर्सचा प्राथमिक उद्देश आहे. या कोर्सचाच एक भाग म्हणून **'आरोग्यावर परिणाम करणारे सामाजिक घटक'** या संदर्भातील माहितीसाठी ही मार्गदर्शिका बनवलेली आहे. 'साथी'च्या निरनिराळ्या प्रकाशनांपैकी या विषयासंबंधीचा मजकूर योग्य ते बदल करून तसेच इतर काही माहितीचा त्यात समावेश करून केलेले लेखन व संकलन म्हणजे ही पुस्तिका होय.

'साथी' संस्थेचे समन्वयक डॉ. अभय शुक्ला यांच्या मार्गदर्शनातून या पुस्तिकेची संकल्पना अस्तित्वात आली. पुस्तिका तयार करताना त्यांच्याबरोबर झालेल्या चर्चा व त्यांचे मार्गदर्शन अत्यंत उपयोगी पडले.

'आरोग्यावर परिणाम करणारे सामाजिक घटक' या विषयीची मांडणी करताना लेखन व संकलनात 'साथी' संस्थेतील तृप्ती मो.मा. यांनी या मार्गदर्शिकेचा मसुदा काळजीपूर्वक वाचून त्यावर तपशिलवार संपादकीय संस्कार केले व मोलाचे योगदान दिले. प्रस्तुत मार्गदर्शिकेसाठी माहिती संकलित करताना संबंधित विषयातील काम करणा-या विविध संस्था तसेच प्रशिक्षण पुस्तिकांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यात प्रामुख्याने लोक स्वास्थ्य संसाधन केंद्र (PHRN) व राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्र (NCAS) या संस्थेच्या प्रशिक्षण पुस्तिकांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. त्याचबरोबर 'साथी' संस्थेद्वारे प्रकाशित 'महाराष्ट्रातील कुपोषणाची गंभीर समस्या' व 'महाराष्ट्रातील आरोग्य विषमता' या पुस्तिकेचाही मार्गदर्शिका तयार करताना उपयोग झाला.

ही पुस्तिका तयार करताना 'साथी'मधील निरनिराळ्या सहकार्यांचे सहकार्य मिळाले. 'साथी' संस्थेतील डॉ. अरूण गद्रे, तृप्ती मो.मा., शकुंतला भालेराव, भाऊसाहेब आहेर, हेमराज पाटील, शैलेश डिखळे यांच्यांशी वेळोवेळी झालेल्या चर्चा या मार्गदर्शिकेला अधिक मुद्देसूद बनवण्यास कामी आल्या. रवी मांडेकर व गजानन लोढे यांनी संगणकीय अक्षर जुळवणी केली. शारदा महल्ले यांनी प्रस्तुत मार्गदर्शिकेची सुबक रचना कमी वेळेत करून दिली. या सर्वांच्या योगदानाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार !

अलायन्स फॉर हेल्थ पॉलिसी ॲन्ड सिस्टीम रिसर्च, डब्ल्यू.एच.ओ. (Alliance for Health Policy and System Reasearch, WHO)च्या आर्थिक सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत! विशेष करून डॉ. भुपिंदर कौर औलख यांनी दिलेल्या तांत्रिक सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार !

सचिन साठे,
तृप्ती मो.मा.
साथी

❑❑❑

**प्रकरण १ :** आरोग्यावर परिणाम करणारे सामाजिक घटक.......................................७

**प्रकरण २** : शिक्षण व आरोग्य..........................................................................१७

**प्रकरण ३** : पाणी व आरोग्य ..........................................................................२३

**प्रकरण ४** : अन्न सुरक्षा, योजना व पोषण व आरोग्य...............................................२८

**प्रकरण ५** : आरोग्यावर परिणाम करणारे घटकाच्या नियोजनाबाबत कार्यकर्ता म्हणून आपण काय करू शकतो.......................................................३८

❑❑❑